**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, JAN–FEB, 2018, VOL- 5/43*

# महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांच्या सद्यःस्थितीचा अभ्यास

**डॉ. पाठकसुहास सखाराम**
**सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
**Email: sspathak2010@gmail.com**
**Mobile No. 9850568411**

**झाकडे अर्चना प्रल्हाद**
**संशोधक विद्यार्थीनी शिक्षणशास्त्र विभाग**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
**Email: archanazakade123@gmail.com**
**Mobile No 8805226459**

---

प्रस्तुत संशोधनामध्ये महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांच्या सद्यःस्थितीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या क्षेत्रअभ्यासाठी १५ स्वायत्त महाविद्यालये तर इंटरनेटवरील अभ्यासासाठी ४५ स्वायत्त महाविद्यालये घेतली होती. तसेच संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धती निवडली होती . त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली, प्राध्यापकांसाठी प्रश्नावली, विभागप्रमुखांसाठी प्रश्नावली, प्राचार्यांसाठी मुलाखत तसेच महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील माहितीचा उपयोग करण्यात आला होता.

महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालये ही विविध प्रकारातील आहेत. त्याचबरोबर विविध विद्याशाखेची स्वायत्त महविद्यालये आहेत. स्वायत्त महाविद्यालयात स्थानिक स्तरावर विविध समित्या स्थापन करुन त्यामार्फत कारभार केला जातो. स्वायत्त महाविद्यालयात शैक्षणिक दिनदर्शिका असून तिची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जाते.

---

इ.स. १८५० मध्ये लंडन विद्यापीठाने सर्वप्रथम स्वायत्त महाविद्यालयाच्या माध्यमातून उच्च शिक्षणास प्रारंभ केला. यानंतर जगातील बहुतांश राष्ट्रांमध्ये ही संकल्पना साकार झाली आहे. वास्तविक पाहता भारतासाठी ही कल्पना नवीन नाही. रामायण व महाभारतातील संदर्भानुसार ऋषीमुनींनी चालवलेले आश्रम म्हणजे स्वायत्त शैक्षणिक संस्थेचा एक आदर्श नमुनाच होता. ब्रिटीश राजवटीत भारतातील हिंदू महाविद्यालय (१९१६), पुणे कॉलेज (१९२१), आग्रा महाविद्यालय (१९२६), एलफिन्स्टन महाविद्यालय (१९३६), मद्रास कॉलेज (१८४२) इत्यादी महाविद्यालये स्वायत्त होती. १८५७ साली मुंबई, कलकत्ता व मद्रास येथे विद्यापीठे स्थापन झाल्यानंतर वरील स्वायत्त महाविद्यालयांना संलग्न महाविद्यालयाचा दर्जा देण्यात आला. काळानुसार अनेक शिक्षणसंस्था स्थापन

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

झाल्या. दिवसेंदिवस विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची संख्या व त्यात शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढत गेली. विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये नावापुरते औपचारिक संबंध उरले. महाविद्यालयीन शिक्षणावर त्याचा विपरित परिणम झाला. त्याचवेळी बदलत्या काळानुसार विविध क्षेत्रामध्ये बदल झाले. तेव्हा शिक्षणक्षेत्रामध्येही बदल अपरिहार्य बनले. गुणवत्ताप्राप्त महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याचा विचार पुढे आला. भारतात सध्याच्या स्वायत्त महाविद्यालयाची सुरुवात पहिल्यांदा तामिळनाडू राज्यात १९७८-७९ साली झाली. तर महाराष्ट्रात स्वायत्त महाविद्यालयास १९९५ - ९६ साली सुरुवात झाली. विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य सरकार व पालक विद्यापीठ यांच्याकडून निर्णय स्वातंत्र्य व अंमलबजावणी स्वातंत्र्य प्राप्त झालेली महाविद्यालय म्हणजे स्वायत्त महाविद्यालय होय. २०१६ साली महाराष्ट्रात फक्त ४५ महाविद्यालये स्वायत्त होती तर सध्या महाराष्ट्रात १६.०६.२०२१ रोजी ११९ महाविद्यालये स्वायत्त आहेत.

**गरजः** उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत ते अभ्यासणे गरजेचे वाटते. उदा. स्वायत्त महाविद्यालय. महाराष्ट्रातील संलग्न महाविद्यलयांना स्वायत्त करण्यासाठी युजीसी, राज्य सरकार व पालक विद्यापीठे या सर्वांकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या दृष्टीने स्वायत्त महाविद्यालयांचा अभ्यास करणे गरजेचे वाटते.

**उपयोगिताः** प्रस्तुत संशोधन महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांची सद्यःस्थिती जाणून घेण्यासाठी उपयुक्त आहे.

**उद्दिष्टेः** महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांच्या सद्यःस्थितीचा अभ्यास करणे.

**परिकल्पनाः** महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयाचा कारभार स्थानिक समित्यानुसार चालविला जात असावा.

**संशोधन पद्धतीः** प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला होता.

**नमुना निवडः** प्रस्तुत संशोधनाच्या क्षेत्र अभ्यासासाठी महाराष्ट्रातील १५ स्वायत्त महाविद्यालये सहेतुक पद्धतींनी निवडली होती तर इंटरनेटवरील माहीतीसाठी ४५ स्वायत्तत महाविद्यालये घेण्यात आली होती.

**संशोधन साधनेः** प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली, प्राध्यापकांसाठी प्रश्नावली, विभागप्रमुखांसाठी प्रश्नावली, प्राचार्यांसाठी मुलाखत या स्वनिर्मित संशोधन साधनांचा तसेच इंटरनेटवरील महितीचाही वापर करण्यात आला होता.


**महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयाच्या प्रकाराबाबत माहीती दर्शविणारे कोष्टक**

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | पूर्णपणे सरकारी | ०६ | १३.३३% |
| २. | खाजगी पण अनुदानित | २२ | ४८.११% |

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | पूर्णपणे स्वयंअर्थसहाय्यित | १७ | ३७.७७% |
| | **एकूण** | **४५** | **१००.००%** |

वरील कोष्टकांद्वारे असे दिसून येते की, महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयाच्या प्रकारांपैकी खाजगी पण अनुदानित या प्रकारातील महाविद्यालये ४८.११ टक्के आहेत.




**निष्कर्षः**

१. महाराष्ट्रातील ४८.११ टक्के स्वायत्त महाविद्यालये ही खाजगी पण अनुदानीत या प्रकारातील आहेत.

२. ६२.२२ टक्के स्वायत्त महाविद्यालये ही अभियांत्रीकी व व्यवस्थापन या प्रकारातील आहेत.

३. ८८.८८ टक्के स्वायत्त महाविद्यालये ही पूर्णतः शहरी भागात आहेत.

४. महाराष्ट्रातील एकूण स्वायत्तताप्राप्त महाविद्यालयांपैकी ९३.३३ टक्के स्वायत्त महाविद्यालये ही आजही स्वायत्त आहेत.

५. ७३.८० टक्के स्वायत्त महाविद्यालयातील अभ्यासक्रमास प्रवेशपूर्व परीक्षेद्वारे प्रवेश दिले जाते.

६. महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यालयाचा कार्यभार महाविद्यालयातील समित्यांमार्फत चालतो.

७. महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यालयात नियामक मंडळ, शैक्षणिक परीषद, अभ्यास मंडळ, वित्त परीषद आणि इतर समित्या कार्ययत आहेत.

८. महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यालयात शासनाची शिष्यवृत्ती व आरक्षित धोरण राबविले जाते.

९. महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यालयात शैक्षणिक दिनदर्शिका उपलब्ध आहे.

१०. महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यालयात सर्वच भौतिक सुविधा उपलब्ध आहेत.

११. ८४ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयातील सर्व सुविधा सुस्थितीत आहेत.

१२. सर्वच स्वायत्त महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

१३. महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयात दृक, श्राव्य व दृकश्राव्य साधने उपलब्ध आहेत.

१४. ८० टक्के विद्यार्थ्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात दिर्घकालिन, अल्पकालीन व कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम चालविले जातात.

१५. ५२ टक्के विद्यार्थ्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात कायमस्वरुपी प्राध्यापक शिकविण्यासाठी उपलब्ध आहेत.

१६. महाराष्ट्रातील सर्वच स्वायत्त महाविद्यालयात प्राध्यापकांच्या विकासासाठी प्राध्यापक विकास कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

१७. ३३.३३ टक्के प्राचार्यांच्या मते, विद्यार्थी व प्राध्यापक कार्यरत राहण्यासाठी त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करतात.

**संदर्भग्रंथः**

१. बर्वे, बी. एन. (२००७). शैक्षणिक मानसशास्त्रीय संख्याशास्त्र, नागपूरः विद्या प्रकाशन.

२. गोगटे, श्री. ब. (२०११). मराठवाड्यातील शिक्षण एकविसाव्या शतकातील आव्हाने, औरंगाबादः स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था.

३. मुळे, सं. ज्ञा. (२०११). शैक्षणिक संशोधनाची ओळख, नाशिकः इनसाईट पब्लिकेशन.

४. पंडित, ब. बि., पाटील, न. आणि मोरे, ल. सू. (२००९). शिक्षकशिक्षण, नागपूरः पिंपळापूरे अँड कं. पब्लिशर्स.

५. www.shodhganga.inflibnet.com.

६. https://www.ugc.ac.in>oldpdf.(2016)

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*